“सेवाग्राम विकास आराखडा”;
जिल्हा, वर्धा.
निधी वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक-सेविआ २०१७/प्र.क्र.६/का.१४४३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १ फेब्रुवारी, २०१८

वाचा : १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. सेविआ २०१३/प्र.क्र.१७/का.१४४३, दिनांक १ ऑक्टोबर, २०१६.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. सेविआ २०१३/प्र.क्र.६/का.१४४३, दिनांक २२ सप्टेंबर, २०१७.
३) जिल्हाधिकारी, वर्धा यांचे पत्र क्र.कक्ष एल/सेविआ/संस-३/कावि-१८१/१७-१८, दिनांक ५ डिसेंबर, २०१७.

प्रस्तावना :

सेवाग्राम, जिल्हा वर्धा परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी सेवाग्राम विकास आराखड्यातील रु.१४५.०० कोटी खर्चाच्या प्रस्तावित कामांना संदर्भाधीन अनुक्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सेवाग्राम विकास आराखड्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रु. ९३.८० कोटी निधी अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी संदर्भाधिन अनुक्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये रु.१०.०० कोटी निधी जिल्हाधिकारी, वर्धा यांना वितरित करण्यात आला आहे. आता सेवाग्राम विकास आराखड्यातील कामांकरिता जिल्हाधिकारी, वर्धा यांनी दिनांक ५ डिसेंबर,२०१७ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सेवाग्राम, जिल्हा वर्धा परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी सेवाग्राम विकास आराखडा, या योजनेतील कामांसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रु.९३.८० कोटी इतका निधी २०१७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. त्यापैकी दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ च्या अनुक्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये रु. १०.०० कोटी निधी जिल्हाधिकारी, वर्धा यांना वितरित करण्यात आला आहे. आता जिल्हाधिकारी, वर्धा यांना एकूण रु. ५०.०० कोटी (अक्षरी रुपये पन्नास कोटी फक्त) निधी, लेखाशिर्षांतर्गत खालील प्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

(रुपये कोटीत)

अ.क्र.	उद्दिष्ट	सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पिय तरतूद	सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी वितरीत करावयाची रक्कम
१	२८-व्यावसायिक सेवा	३.००	१.००
२	५३-मोठी बांधकामे	९०.८०	४९.००
एकूण		**९३.८०**	**५०.००**

सदरहू खर्च मागणी क्रमांक ओ-१०, ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, १०२-सामुहिक विकास, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०१)-बुहउद्देशिय कार्यक्रम, (०१)(४२)-सेवाग्राम विकास योजना, जिल्हा वर्धा (४५१५०८६१) या लेखाशिर्षांखाली खर्ची टाकण्यात यावा. वर नमुद केलेल्या लेखाशिर्षांतर्गत झालेला प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल कार्यालयाने नोंदविलेल्या **खर्चाचा दरमहा ताळमेळ घालण्यात यावा. वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तात्काळ सादर करावे.**

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०११७४२०२९३१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vidya Hampayya
Date: 2018.02.02 11:26:24 +05'30'

(विद्या हम्पय्या)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मुंबई
५) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६) सर्व सन्माननीय संसद सदस्य /विधानसभा/ विधान परिषद सदस्य,
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर

१०) वित्त विभाग (व्यय-८), (अर्थ-१६), मंत्रालय, मुंबई

११) विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर

१२) जिल्हाधिकारी, वर्धा

१३) जिल्हा नियोजन अधिकारी, वर्धा

१४) नियोजन विभाग, का.१४२४, मंत्रालय, मुंबई

१५) निवड नस्ती, नियोजन विभाग, का.१४४४, मंत्रालय, मुंबई